नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ५२ Issue - 52 | वार मंगळवार दि. ८ जुलै २०२५ Blow- Tuesday Date 8 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## निवडणुकांचा बिगुल; निवडणूक आयोगाने बोलावली जिल्हाधिकाऱ्यांची बैठक

### ३२ जिल्हा परिषद, ३३६ पंचायत समित्या, २४८ नगरपरिषद, ४२ नगरपंचायती व २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी एकीकडे राजकीय पक्ष कामाला लागले असून दुसरीकडे राज्य निवडणूक आयोगानेही मोहिम हाती घेतली आहे. त्यासाठीच, राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पत्राद्वारे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने बैठकीसाठी बोलावलं आहे. मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून राज्यातील इतर सर्व जिल्ह्यातील निवडणूक पूर्व परिस्थितीचा आढावा या बैठकीत घेतला जाणार आहे. त्याअनुशंगाने जिल्हाधिकाऱ्यांना बैठकीसाठी काय तयारी करायची आणि काय माहिति घेऊन हजर राहायचे याबाबतही सांगण्यात आलं आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २०२५ हाच या बैठकीचा विषय असून १० जुलै रोजी दुपारी १२ वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे ही बैठक होणार आहे.

राज्यातील ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्या, २४८ नगरपरिषदा, ४२ नगरपंचायती व २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका आगामी काळात घेण्यात येणार आहेत. या निवडणुकीच्या (महानगरपालिका वगळून) पूर्वतयारीचा विभागनिहाय आढावा मा. राज्य निवडणूक आयुक्त व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे घेणार आहेत. या बैठकीमध्ये खालील विषयांचा आढावा घेण्यात येईल, असे परिपत्रकच राज्य निवडणूक आयोगाने काढले आहे.

१. निवडणुका घेण्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था २. मतदार संख्या ३. मतदान केंद्र ४. ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे ५. आवश्यक मनुष्यबळ ६. वेळेवर उपस्थित होणारे मुद्दे

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सोबतच्या परिपत्रामध्ये माहिती तयार करून ती आयोगास झक्रू त्रेीरीं मध्ये ई-मेलद्वारे ९ जुलै २०२५ रोजी किंवा तत्पूर्वी सादर करण्यात यावी. तसेच उक्त नमूद सर्व मुद्यांसंदर्भातील माहितीसह व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे होणाऱ्या बैठकीस आपण व्यक्तिशः उपस्थित राहावे, ही विनंती. सदर व्हिडिओ कॉन्फरन्सची लिंक यथावकाश उपलब्ध करून देण्यात येईल,असे या परिपत्रकात सांगण्यात आले आहे. राज्य निवडणूक आयोगाच्यावतीने उपायुक्त राजेंद्र पाटील यांनी याबाबतचे पत्र राज्यातील सर्व विभागीय आयुक्तांना लिहिले आहे. तसेच, उपरोक्त व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे होणाऱ्या बैठकीस आपण उपस्थित राहावे, असेही सांगण्यात आले आहे.

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे घ्यावयाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकरिता सद्यस्थितीत आपल्या जिल्ह्यात उपलब्ध असलेले कंट्रोल युनिट, बॅलेट युनिट व मेमरी याबाबतची अद्ययावत माहिती देण्यात यावी. तसेच एका कंट्रोल युनिटवर दोन पेक्षा अधिक बॅलेट युनिट जोडणे शक्य असल्याचे विचारात घेऊन आवश्यक उण, इण व ऊ्रच् ची संख्या निश्चित करण्यात यावी. प्राथमिक स्तर तपासणी करून घेण्याचा कार्यक्रम निश्चित करावा. सुरक्षित ठेवण्यासाठी सद्याची व्यवस्था, त्याचा गोडावूननिहाय तपशील. तसेच नवीन एतच् खरेदी करण्याचे प्रस्तावित असल्याने, त्याकरिता आवश्यक असलेली जागा निश्चित करण्यात यावी. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे प्रशिक्षणासाठी जिल्ह्यात उपलब्ध मास्टर ट्रेनर्स व अतिरिक्त लागणारे मास्टर ट्रेनर्स. आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध आहे किंवा कसे? याबाबत खात्री करावी. अधिकचे मनुष्यबळ अपुरे पडत असल्यास, संबंधित विभागातील विभागीय आयुक्त यांच्याकडे त्याकरिता मागणी सादर करावी.

## शेतकऱ्यांचा सातबारा कोरा न केल्यास मंत्रालयात घुसणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अमरावती : शेतकऱ्यांचा सातबारा कोरा झाला पाहिजे, या निर्धाराने भर पावसातही हजारो शेतकऱ्यांनी '७/१२ कोरा कोरा कोरा' यात्रेला पापळ येथून आक्रमक सुरुवात केली. प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष व माजी मंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली आजपासून सुरू झालेली ही यात्रा केवळ पदयात्रा नसून, शेतकऱ्यांच्या हक्कासाठी पुकारलेले निर्णायक आंदोलन आहे. आमच्या मागण्या मान्य कराव्यात, अन्यथा हीच पदयात्रा आम्ही सरकारच्या स्वागतासाठी घेऊन जाऊ, मागण्या मान्य न झाल्यास संपूर्ण महाराष्ट्रभर २ हजार किलोमीटरची पदयात्रा काढू व दोन तारखेला मंत्रालयात घुसू, असा इशारा बच्चू कडू यांनी दिला आहे.

देशाचे पहिले कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जन्मगावी म्हणजेच पापळ येथून सोमवारी सकाळी १० वाजता ही यात्रा निघाली. ही पदयात्रा उंबरडा बाजार, मानकी, वळसा, तिवरी, तुपटाकळी, काळी दौलत, गुंज अशी गावे पार करत १४ जुलै रोजी चिलगव्हाण येथे स्व. साहेबराव करपे यांच्या स्मृतिस्थळी जाहीर सभेने समाप्त होणार आहे. या यात्रेत शेतकरी, महिलांनी, तरुणांनी, आणि प्रहारच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. यात्रेदरम्यान आंदोलक शेतकऱ्यांनी सरकारवर आणि विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर थेट टीका केली. लाडकी बहीण योजना आणताना कोणतीही समिती न करता सरकारने तातडीने निर्णय घेतला, मग कर्जमाफी आणि ७/१२ कोरा करण्यासाठी समिती कशाला? असा थेट सवाल उपस्थित करत शेतकऱ्यांनी सरळ सातबारा कोरा संदर्भात घोषणा करण्याची मागणी केली.

बच्चू कडू यांनी यापूर्वी अन्नत्याग आंदोलन करताना सरकारकडून शेतकऱ्यांसाठी आश्वासन मिळवले होते. मात्र, त्यानंतर आजपर्यंत कोणतीही ठोस कृती झाली नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष आहे. कालच आषाढी एकादशीच्या दिवशी मुख्यमंत्री फडणवीस लाखो भाविकांसमोर पंढरपूर येथे उभे होते, पण तिथेही शेतकऱ्यांसाठी एकही शब्द न बोलता निघून गेले, ही शेतकऱ्यांच्या अपमानाची परिसीमा असल्याचे आंदोलक म्हणाले. आम्हाला सरकारची

### बच्चू कडू यांचा सरकारला आक्रमक इशारा

सहानुभूती नको, आम्हाला आमचा अधिकार हवा. सातबारा कोरा झाला नाही, तर आम्ही रस्त्यावर उतरणारच, असा इशाराही आंदोलकांनी दिला. दरम्यान, आज पापळ येथून या क्रांतिकारी आंदोलनाची मशाल पेटली असून जिल्ह्यातीलच नव्हे तर राज्यातील शेतकरी या आंदोलनामुळे पेटून उठला आहे. बच्चू कडू यांनी '७/१२ कोरा कोरा' या आंदोलनाच्या माध्यमातून सरकारला थेट इशारा दिला असून या आंदोलनामुळे सरकारचीही कोंडी होणार आहे.

## दर्शनरांगेतील भाविकास कंत्राटी कर्मचाऱ्याकडून मारहाण, कर्मचारी निलंबित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : आषाढी यात्रा २०२५ कालावधी सुरू आहे. त्यामुळे श्रींच्या दर्शनरांगेत भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी आहे. या भाविकांचे सुलभ व जलद दर्शन होण्याच्या अनुषंगाने दर्शनरांगेत कंत्राटी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तथापि, दिनांक ०७ जुलै रोजी पहाटे ३.३० वाजता वा त्या दरम्यान श्री विठ्ठल रूक्मिणीमातेच्या पदस्पर्शदर्शनरांगेत रिध्दी सिध्दी दर्शनमंडप क्र. ०९ मध्ये श्री संजीव कोंडीबा शिवाळे रा. नांदेड या भाविकाची व तेथील बीव्हीजी कंपनीचे कंत्राटी कर्मचारी श्री रोहित कुंभार रा. कोल्हापूर यांच्यामध्ये बाचाबाची झाल्याची घटना घडली आहे. तद्नंतर पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे ठाणे अंमलदार यांनी संबंधित भाविक व सुरक्षा रक्षकास पोलीस स्टेशनमध्ये जबाब - नोंद घेऊन समज देऊन सोडण्यात आले आहे.

पहाटे ३.३० ते ४.०० च्या दरम्यान रिध्दी सिध्दी दर्शनमंडप क्र. ०९ मधून श्री संजीव शिवाळे रा. नांदेड हा भाविक दर्शनरांगेतून वॉशरूमला गेला होता व वॉशरूममधून येईपर्यंत त्यांच्यासोबतचे व्यक्ती दर्शनरांगेतून पुढे गेले होते. त्यामुळे सदर भाविकाने दर्शनरांगेतील त्याच्यासोबतच्या व्यक्तीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला व त्यामधून सदर भाविक व सुरक्षा रक्षकामध्ये वाद झाला. या भाविकाने वॉशरूमला जाण्यासाठी ज्या ठिकाणातून दर्शनरांगेतून बाहेर आला होता. त्याठिकाणीच पून्हा दर्शनरांगेत प्रवेश करणे आवश्यक असताना, बॅरीकेटींगवरून उडी मारून पुढे जाण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी बॅरीकेटींग व बांबूमुळे त्यांना दुख:पत झाली होती. याशिवाय, सदर घटनेबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार नसल्याचा जबाब संबंधित भाविकांने पोलीस विभागास दिला आहे. त्याची स्टेशन डायरीला नोंद घेऊन समज देऊन सोडण्यात आले आहे. तसेच बीव्हीजी कंपनीने संबंधित सुरक्षा रक्षकाला सेवेतून कमी केले आहे.

तथापि, अशा घटना पुन्हा घडणार नाहीत याची योग्य ती दक्षता घेण्याबाबत समज देण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

## हिमाचलमध्ये निसर्गाचा प्रकोप सुरुच; प्रलयकारी पावसात पाच पूल वाहून गेले, १५ दिवसांत ७५ जणांचा मृत्यू, ३१ अजूनही बेपत्ता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : हिमाचल प्रदेशात अवघ्या दोन आठवड्यात मान्सूनने प्रचंड उद्धवस्त केले आहे. मुसळधार पाऊस, भूस्खलन आणि ढगफुटीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात लोकांचा मृत्यू झाला आहे आणि अनेक जण बेपत्ता असल्याची माहिती आहे. ढगफुटीनंतर अचानक आलेल्या पुरामुळे झालेल्या मोठ्या विध्वंसातून हिमाचल प्रदेश सावरू शकलेले नाही. दरम्यान, हवामान खात्याने जारी केलेल्या अलर्टमुळे लोक घाबरले आहेत. हवामान खात्याने ६ जुलै दुपारी ते ७ जुलै दरम्यान मंडी, कांगडा, सिरमौर येथे मुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. हा अलर्ट आपत्तीग्रस्त लोकांच्या जखमांवर मीठ चोळण्यासारखा आहे.

हवामान खात्याने चंबा, कांगडा, मंडी आणि सिरमौर येथेही अचानक आलेल्या पुराचा अलर्ट जारी केला आहे. हवामान खात्याने ८ जुलैपर्यंत राज्यातील अनेक भागात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. सरकारी प्रशासनाने लोकांना सतर्क राहण्याचा सल्ला दिला आहे.



हिमाचलमध्ये मान्सूनमुळे आतापर्यंत ७२ जणांचा मृत्यू झाला आहे. ११३ जण जखमी झाले आहेत तर ३७ जण अजूनही बेपत्ता आहेत. मुख्यमंत्री राज्यात ७०० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा करत असले तरी, आपत्ती व्यवस्थापनाने ५४१ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा आकडा दिला आहे. राज्यात २६१ रस्ते बंद आहेत. ३०० ट्रान्सफॉर्मर बंद आहेत. २८१ पिण्याच्या पाण्याच्या योजनांचा पाणीपुरवठा खंडित झाला आहे. ५२१ प्राणी आणि पक्षी वाहून गेले आहेत, १९ घरे पूर्णपणे उद्धवस्त झाली आहेत, ८२ घरांचे नुकसान झाले आहे, २०५ जनावरांचे गोठे वाहून गेले आहेत. मंडीमध्ये सर्वाधिक नुकसान झाले आहे जिथे १५ जणांचा मृत्यू झाला आहे, अनेक लोकांचा शोध सुरू आहे. मंडीमध्ये १७६ रस्ते बंद आहेत. कुल्लूमध्ये ३९, सिरमौरमध्ये १९, कांगडामध्ये १२० आणि शिमलामध्ये ६ रस्ते बंद आहेत. मंडीच्या सेराजमध्ये मदत आणि बचाव कार्यासाठी सैन्याला मैदानात उतरावे लागले. दरम्यान, झारखंडमध्ये शनिवारी मुसळधार पाऊस पडला. रामगड जिल्ह्यातील महुआ टांगरी येथे सकाळी एक बेकायदेशीर कोळसा खाण कोसळली. यामध्ये ४ जणांचा मृत्यू झाला आणि ४ जण जखमी झाले. सोमवार सकाळपर्यंत राज्यात मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट आहे. मध्य प्रदेशात जोरदार पावसाची यंत्रणा सक्रिय असल्याने पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. मुसळधार पावसामुळे मंडला जिल्ह्यात नर्मदा नदीला पूर आला आहे. येथे, नरसिंहपूर ते होशंगाबादला जोडणारा राष्ट्रीय महामार्गावरील पूल कोसळला.आज बिहारमधील १८ जिल्ह्यांमध्ये पावसाचा यलो अलर्ट आहे. या जिल्ह्यांमध्ये हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. जोरदार वारेही वाहू शकतात. शनिवारी मुंगेरच्या अररिया येथे पाऊस पडला. सासाराममध्ये वीज पडून दोन महिलांचा मृत्यू झाला. तर एका महिलेला जबर दुखापत झाली.

### भीषण अपघातात ३० प्रवाशी जखमी

### पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी घेतली धाव

## पंढरपूरवरुन परतणाऱ्या भाविकांची एसटी बस बुलढाण्यात पलटी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा : आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर यात्रा आटोपून परतत असलेल्या भाविकांच्या एसटी बसला चिखलीजवळ अपघात झाला. ही बस चिखली तालुक्यातील महाबीज कार्यालयासमोर असलेल्या दुभाजकावर आदळून पलटी झाली. ही घटना आज पहाटे सुमारे ४ वाजता घडली. या अपघातात सुमारे ३० प्रवासी भाविक जखमी झाले असून कोणतीही जीवितहानी झाली नाही.

ही एसटी बस पंढरपूरहून खामगावच्या दिशेने जात होती. बसमध्ये एकूण ५१ भाविक प्रवास करत होते. पहाटे चार वाजताच्या सुमारास चिखली शहराजवळ महाबीज कार्यालयाच्या समोर नियंत्रण सुटल्यामुळे बस थेट दुभाजकावर आदळली आणि पलटी झाली. बसच्या समोरच्या भागाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेला असून अपघाताची तीव्रता देखील अधिक होती.

आज पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास पंढरपूर आषाढी वारी आटोपून खामगावकडे जात असलेली एसटी बस बुलढाणा जिल्ह्यातील चिखलीजवळ महाबीज कार्यालयासमोर आली



असताना बस दुभाजकावर आदळून पलटी झाली. या बसमध्ये ५१ भाविक प्रवास करत होते. या भीषण अपघातात सुमारे ३० प्रवासी जखमी झाले.या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. अपघात होताच परिसरातील नागरिकांनी तत्काळ मदत करत जखमींना बाहेर काढलं आणि चिखली व बुलढाणा येथील रुग्णालयात उपचारासाठी हलवलं. बसचं मोठं नुकसान झालं असून अपघाताची कारणमीमांसा पोलिसांकडून सुरू आहे.

अपघात घडल्यानंतर आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांनी धाव घेत जखमींना तत्काळ बाहेर काढले आणि चिखली तसेच बुलढाणा येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी हलवले. जखमींपैकी काहींना किरकोळ दुखापती झाल्या असून त्यांची प्रकृती स्थिर आहे, असे डॉक्टरांनी सांगितले. पंढरपूर यात्रा आटोपून भाविक घरी परतत असताना हा अपघात घडल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली असून अपघाताच्या कारणांची चौकशी सुरू आहे.

तेलंगणा फार्मा कारखान्यातील स्फोटातील मृतांची संख्या ४२ वर पोहोचली आहे. ८ जण अजूनही बेपत्ता आहेत. अपघातानंतर ६ दिवसांनीही शोध मोहीम सुरू आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, शनिवार आणि रविवारी अपघातस्थळावरून काही हाडे आणि जळालेले अवयव सापडले. ३० जून रोजी सकाळी सव्वा आठ ते साडे नऊच्या दरम्यान, साडे आठ ते साडे नऊ दरम्यान पासुमिलाराम औद्योगिक क्षेत्रातील सिगाची इंडस्ट्रीजमध्ये हा अपघात झाला. घटनेच्या वेळी कारखान्यात १५० लोक होते, स्फोट झाला त्या ठिकाणी ९० लोक उपस्थित होते. त्या दिवशी बचाव आणि वैद्यकीय पथकाने ३१ मृतदेह बाहेर काढले.

## संपादकीय....

### निसर्गाचा प्रकोप

हिमाचलमध्ये मान्सूनमुळे आतापर्यंत ७२ जणांचा मृत्यू झाला आहे. ११३ जण जखमी झाले आहेत तर ३७ जण अजूनही बेपत्ता आहेत. मुख्यमंत्री राज्यात ७०० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा करत असले तरी, आपत्ती व्यवस्थापनाने ५४१ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा आकडा दिला आहे. राज्यात २६१ रस्ते बंद आहेत. ३०० ट्रान्सफॉर्मर बंद आहेत. २८१ पिण्याच्या पाण्याच्या योजनांचा पाणीपुरवठा खंडित झाला आहे. ५२१ प्राणी आणि पक्षी वाहून गेले आहेत, १९ घरे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत, ८२ घरांचे नुकसान झाले आहे, २०५ जनावरांचे गोठे वाहून गेले आहेत. हिमाचल प्रदेशात अवघ्या दोन आठवड्यात मान्सूनने प्रचंड उद्ध्वस्त केले आहे. मुसळधार पाऊस, भूस्खलन आणि ढगफुटीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात लोकांचा मृत्यू झाला आहे आणि अनेक जण बेपत्ता असल्याची माहिती आहे. ढगफुटीनंतर अचानक आलेल्या पुरामुळे झालेल्या मोठ्या विध्वंसातून हिमाचल प्रदेश सावरू शकलेले नाही. दरम्यान, हवामान खात्याने जारी केलेल्या अलर्टमुळे लोक घाबरले आहेत. हवामान खात्याने ६ जुलै दुपारी ते ७ जुलै दरम्यान मंडी, कांगडा, सिरमौर येथे मुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. हा अलर्ट आपत्तीग्रस्त लोकांच्या जखमांवर मीठ चोळण्यासारखा आहे. हवामान खात्याने चंबा, कांगडा, मंडी आणि सिरमौर येथेही अचानक आलेल्या पुराचा अलर्ट जारी केला आहे. हवामान खात्याने ८ जुलैपर्यंत राज्यातील अनेक भागात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. सरकारी प्रशासनाने लोकांना सतर्क राहण्याचा सल्ला दिला आहे. मंडीमध्ये सर्वाधिक नुकसान झाले आहे जिथे १५ जणांचा मृत्यू झाला आहे, अनेक लोकांचा शोध सुरू आहे. मंडीमध्ये १७६ रस्ते बंद आहेत. कुल्लूमध्ये ३९, सिरमौरमध्ये १९, कांगडामध्ये १२० आणि शिमलामध्ये ६ रस्ते बंद आहेत. मंडीच्या सेराजमध्ये मदत आणि बचाव कार्यासाठी सैन्याला मैदानात उतरावे लागले. दरम्यान, झारखंडमध्ये शनिवारी मुसळधार पाऊस पडला. रामगड जिल्ह्यातील महुआ टांगरी येथे सकाळी एक बेकायदेशीर कोळसा खाण कोसळली. यामध्ये ४ जणांचा मृत्यू झाला आणि ४ जण जखमी झाले. सोमवार सकाळपर्यंत राज्यात मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट आहे. मध्य प्रदेशात जोरदार पावसाची यंत्रणा सक्रिय असल्याने पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. मुसळधार पावसामुळे मंडला जिल्ह्यात नर्मदा नदीला पूर आला आहे. येथे, नरसिंहपूर ते होशंगाबादला जोडणारा राष्ट्रीय महामार्गावरील पूल कोसळला.आज बिहारमधील १८ जिल्ह्यांमध्ये पावसाचा यलो अलर्ट आहे. या जिल्ह्यांमध्ये हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. जोरदार वारेही वाहू शकतात. शनिवारी मुंगेरच्या अररिया येथे पाऊस पडला. सासाराममध्ये वीज पडून दोन महिलांचा मृत्यू झाला. तर एका महिलेला जबर दुखापत झाली.

# लोककलेच्या मौखिक साधनांनी ग्रामीणात रोवणीला वेग...!

## पावसाची हजेरी-रोवणीचा दुजोरा : रोवणी एक उत्सव





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी/बाराभाटी :

पावसाच्या सोबतीन अंग भिजे
जागो जागी, केवळा मोठा गुणवाण,
कोण बाई राबविले मना,
केवळा बोले हो केवळा बोले' असे सुमधूर लोकगीत कानाला ऐकायला मिळत आहे. ही गाणी कुठल्या कार्यक्रमात गायली जात नसून, ती शेतशिवारात सुरू असलेल्या रोवणी दरम्यान महिलांकडून गायली जात आहे. ही लोकगीत कानावर पडल्याने परिसरातील शेतात रोवणी सुरू असल्याचे लक्षात येते.

गावकुसाबरोबर अर्जुनीमोरगाव तालुक्यात धान रोवणी धडाक्यात सुरू असून लोकगीतांनी शेतकऱ्यांचे शिवार गुंजू लागले आहे. या गितांनी आसमंत दुमदुमु लागले आहे. प्रारंभीचे काही दिवस पावसाअभावी कोरडे गेले. त्यामुळे शेतकऱ्यांचा जीव कासावीस होत असतानाच आता पावसाने हजेरी लावल्याने चिंताग्रस्त शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. मुबलक पावसामुळे अनेकांनी प्रत्यक्ष रोवणीच्या कामाला धडाक्यात सुरूवात केली आहे.

प्रत्येक शेतकरी आपल्या शेतात जास्तीत जास्त महिला मजुरांना रोवणीसाठी बोलावू लागले, पऱ्हे काढणाऱ्यांनी पऱ्हे काढले, चिखल केलेल्या बांधीत पेंड्या पसरविल्या आहेत. डोक्यावर मोऱ्याचे वजन घेवून रोवणी करीत मागे जाणाऱ्या महिला

उठ उठ पाकुरा,
जा माझ्या मायेरा,
केवळा मोठा गुणबाण,
कोण बाई राबविले मन्हा,
केवळा बोले हो केवळा बोले

असे लोकगीत गात भात रोवणी करीत आहेत. पुढे मालकीन व मागे मालक यांचा, रोवणी लवकर उरकावा यासाठी तगादा सहन करीत केव्हा एकदा पात पडते, यांची प्रत्येक जण वाट पाहताना दिसत आहे.

पात पडली की, थोडी उसंत घेणे आणि पुन्हा नवीन पातीसाठी सज्ज होत आहेत. अशिक्षित महिलांनी यमक अनुप्रास यांचा योग्य वापर करून रचलेली सुरेख गाणी कानावर पडताच बहिनाबाई चौधरी यांची आठवण झाल्यावाचून राहत नाही. एका शेतकऱ्याच्या महिलांनी म्हटलेले हे गीत.. पावसाच्या सोबतीन,

अंग भिजे जागो जागी,
घरातील सुहास चंदनाचा,
शेतकरी धरणी मायेले,
दान पिकाची घरी....

पेरणीच्या कामांना जोमाने सुरूवात करण्यात आली. शालेय मुले-मुली वार्षिक शैक्षणिक खर्च काढण्यासाठी शेतशिवारात कामावर जात आहेत. अस्सल लोकगीतांची खाण असलेल्या शेतशिवारात सर्वदूर मजूर कोकीळेचे सूर ऐकायला येतात, याच सामूहिक लोकगीतांची मैफील धान रोवणी करताना दिसून येते.

गावच्या पाटलाचा, शेतशिवारी
रोवणा, राखी बांधाया, येईल बयना,
लागे पावसाचा हेवा,
हर बोला हर हर महादेवा

अशा लोकगीतांनी शेतशिवार चैतन्याने न्हाऊन निघाले आहे. रोवणीच्या वेळी लोकगीत म्हणण्याची पद्धत पूर्वीच्या काळापासून रूजली आहे. अलीकडच्या धकाधकीच्या युगात पुरातन स्त्री शेतावर असे लोकगीत म्हणताना दिसत आहे.

इतर मजुरांमध्ये शाळकरी मुली, शिक्षित स्त्री या सुद्धा शेतात रोवणीला जात असल्यामुळे त्यांच्या तोंडी पुरातन रोवणीच्या गीताऐवजी चित्रपटातील गाणे गाताना दिसत आहे. लोकगीत काळानुरूप लुप्त होत चालली आहेत. अनेक काळापासून सुरू असलेल्या लोकगीताच्या संस्कृतीला नव्या पिढीने नाकारले आहे.रोवणी संपल्याने शेतकरी समाधानीपावसाने चांगली साथ देवून रोवणी आटोपल्यानंतर बळीराजाला आनंद होतो.

रोवणीचा चिखलोत्सव

रोवणी संपण्याच्या दिवशी चिखलाची पूजा करून तो प्रत्येकाला लावतात आणि अंगावर चिखल टाकला जातो. खांद्यावर नांगर घेवून चालणारी गडी माणसं आणि मागे गीत गाणाऱ्या महिला यांच्या सोबत मालक मालकीण घराकडे जाताना गाणे गात जातात. कोण्या पाटलाचा, रोवणा सरला गं, पाटलाचा रोवणा सरला, वजा आणते कोणाची राणी, वजा आणते पाटलाची राणीअशी गाणी म्हणत सारे देवळापाशी येतात आणि देवळाला चिखल अर्पण करतात, असे चित्र ग्रामीण भागात पहावयास मिळत आहे.

# आता ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मिळणार मोफत जेईई, सीईटीची कोचिंग

### पालकमंत्र्यांच्या हस्ते 'चांदा ज्योती सुपर १००' अभ्यासिकेचे उद्घाटन; जिल्हा परिषदेचा अभिनव उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चंद्रपूर : ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाखाणण्याजोगी असते. मात्र आर्थिक परिस्थितीमुळे किंवा संधी उपलब्ध न झाल्यामुळे असे विद्यार्थी स्पर्धेच्या युगात मागे राहून जातात. यावर तोडगा काढण्यासाठी तसेच हुशार विद्यार्थ्यांच्या पंखांना बळ देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या वतीने 'चांदा - ज्योती सुपर १००' अभ्यासिकेचा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या अभ्यासिकेच्या माध्यमातून आता ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोफत जेईई - सीईटीची कोचिंग मिळणार आहे.

राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांच्या हस्ते या अभ्यासिकेचे उद्घाटन शनिवारी (दि.५) करण्यात आले. शहरातील ज्युबली हायस्कुलच्या परिसरात पार पडलेल्या या कार्यक्रमाला आमदार किशोर जोरगेवार, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. मनपा आयुक्त विपीन पालीवाल, प्रभारी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी गिरीश धायगुडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मिना साळूंके, शिक्षणाधिकारी राजेश पाताळे, अश्विनी सोनवणे, उपशिक्षणाधिकारी विशाल देशमुख आदी उपस्थित होते.

ग्रामीण विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी जिल्हा परिषदेने अतिशय चांगला आणि नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू केला आहे, असे सांगून पालकमंत्री डॉ. अशोक उईके म्हणाले, इयत्ता ११ वीचे ५० आणि इयत्ता १२ वीचे ५० असे एकूण १०० विद्यार्थ्यांना मोफत जेईई - सीईटीचे मार्गदर्शन मिळणार आहे. विशेष म्हणजे ग्रामीण भागातील या विद्यार्थ्यांची राहण्याची आणि जेवण्याची सोयसुध्दा जिल्हा परिषदेमार्फत मोफत आहे. या उपक्रमाचा फायदा नक्कीच जिल्ह्यातील होतकरू आणि मेहनती विद्यार्थ्यांना होईल.

आज या अभ्यासिकेचे उद्घाटन झाले असले तरी, येथील विद्यार्थी पुढील वर्षीच्या जेईई - सीईटी परिक्षेत उल्लेखनीय कामगिरी करतील तेव्हा खरे सार्थक होईल. १०० विद्यार्थ्यांची निवड करताना अतिशय काटेकोरपणे करा. चाचणी परिक्षेद्वारेच निवड व्हावी, कोणाच्याही शिफारसीने विद्यार्थ्यांना अजिबात प्रवेश देऊ नका. या अभ्यासिकेसाठी ग्रामीण भागातील हुशार आणि चांगले विद्यार्थी निवडले गेले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या भविष्याबाबत केवळ एकच उद्दिष्ट न ठेवता जेईई - सीईटी प्रमाणेच इतरही स्पर्धा परिक्षेचे मोफत मार्गदर्शनसुध्दा या अभ्यासिकेतून मिळण्यासाठी नियोजन करावे, अशा सुचनाही पालकमंत्री डॉ. उईके यांनी दिल्या.



तत्पुर्वी पालकमंत्र्यांच्या हस्ते अभ्यासिकेच्या परिसरात वृक्षारोपन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी फित कापून अभ्यासिकेचे उद्धाटन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षणाधिकारी अश्विनी सोनवणे यांनी केले. यावेळी विद्यार्थी व इतर पालक उपस्थित होते.

या मिळणार सुविधा : ग्रामीण विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्याची दिशा ठरविण्यासाठी 'चांदा - ज्योती सुपर १००' या अभ्यासिकेमध्ये दर्जेदार कोचिंग व मार्गदर्शन, निवासी व जेवणाची मोफत सोय, अभ्यास साहित्य, समुपदेशन व टेस्ट सिरीज, क्षेत्रभेटी व प्रेरणादायी संवाद.

## 'टेक वारी'चा ऑनलाईन शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर येथील अरिहंत पब्लिक स्कूलतर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'टेक वारी' या आगळ्या-वेगळ्या उपक्रमाचे उद्धाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतेच व्हिडिओ कॉलद्वारे केले.

आषाढी एकादशीनिमित्त शहरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असताना, अरिहंत शाळेने कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या साहाय्याने एक अभिनव पाऊल उचलले आहे. विद्यार्थ्यांनी तयार केलेले तंत्रज्ञानाधारित प्रकल्प 'टेक वारी' या नावाने सादर करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्याकडून प्रकल्पांची माहिती घेतली.

# अथांग बागड़े च्या नेतृत्वात एक्ससाईट प्ले टर्फ वर इतिहास रचला




### यंग डायमंड फुटबॉल लीग टुर्नामेंट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर/प्रतिनिधी : जल्लोष आणि उत्साहाने भरलेल्या एका रोमांचक अंतिम सामन्यात भवन्स सिव्हिल लाईन्स शाखेचा विद्यार्थी अथांग प्रवीण बागडेने आज नागपूरमधील एक्ससाईट प्ले टर्फ ग्राउंड, के.टी. नगर येथे झालेल्या यंग डायमंड फुटबॉल लीगमध्ये डीडीएसवायएस टीमला गौरवशाली विजय मिळवून देऊन इतिहासात आपले नाव कोरले. हा ऐतिहासिक विजय क्लबच्या वारशात पहिल्यांदाच घडला आहे जेव्हा संघ पहिल्यांदाच कर्णधार अथांग बागडेच्या नेतृत्वाखाली अंतिम फेरीत पोहोचून विजेतेपद मिळविले. अभिमानी पालक, उत्साही चाहते आणि तरुण प्रतिभेचा आनंद साजरा करणाऱ्या जल्लोषात एक्ससाईट प्लेमधील वातावरण उत्साहवर्धक होते. शाळेच्या खेळाच्या मैदानापासून ते स्पर्धेतील यशापर्यंतचा अथांगचा प्रवास समर्पण, टीमवर्क आणि विश्वासाने काय साध्य करता येते याचे एक ज्वलंत उदाहरण आहे. वयापेक्षा जास्त प्रतिभा आणि हृदयात आग असल्याने, येत्या हंगामात हा तरुण फुटबॉलपटू निःसंशयपणे लक्ष ठेवण्याजोगा आहे. त्याने या प्रतिष्ठित युवा स्पर्धेत प्रथमच आपल्या संघाचे नेतृत्व केले, प्रशिक्षक राहुल बांते आणि रोहित सौदागर यांच्या अनुभवी मार्गदर्शनाखाली अपवादात्मक नेतृत्व, लवचिकता आणि रणनीतिक कौशल्य दाखवून, त्याने केवळ त्याच्या सहकाऱ्यांना प्रेरणा दिलीच नाही तर शहरातील युवा फुटबॉलच्या भावनेची पुनर्परिभाषा देखील केली. अंतिम फेरीत संकल्प एसएफ संघाचा सामना करताना, डीडीएसवायएस संघाने तीव्रता आणि शिस्तीने भरलेले प्रदर्शन केले आणि अखेर हा प्रतिष्ठित चषक जिंकला. त्याने त्याचे सर्व श्रेय त्याचे पालक, त्याचा मोठा भाऊ आणि खेळाडू अथर्व, प्रशिक्षक राहुल बांते, रोहित सौदागर आणि संघातील खेळाडूंना दिले.

# निफाड येथील बापू मोरे राज्यस्तरीय युवा शेतकरी पुरस्काराने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्रातील नव्या पिढीतील कर्तृत्ववान शेतकऱ्यांचा गौरव करण्यासाठी 'राज्यस्तरीय युवा शेतकरी सन्मान सोहळा - २०२५' चे भव्य आयोजन . राज्याच्या हरितक्रांतीचे शिल्पकार कै. वसंतराव नाईक यांच्या स्मृतीदिनी आणि कृषी दिनाच्या औचित्य साधून कृषी विभाग आणि जयहिंद लोकचळवळ यांच्या संयुक्त विद्यमाने. शनिवार, ५ जुलै २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता नाशिक येथे गोखले एज्युकेशन सोसायटीच्या कॉलेज रोडवरील गुरुदक्षिणा सभागृहात आयोजित करण्यात आला होता.




शेतीच्या पारंपरिक चौकटी मोडून, आधुनिक तंत्रज्ञान, नाविन्यपूर्ण कल्पना, सेंद्रिय शेती, प्रक्रिया उद्योग, जलसंवर्धन, अन्न साखळी व्यवस्थापन यांसारख्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवा शेतकऱ्यांचा सन्मान.

राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, माजी महसूल व कृषी मंत्री . बाळासाहेब थोरात, वित्त, कृषी, मदत व पुनर्वसन राज्यमंत्री . आशिष जयस्वाल, उद्योग व उच्च तंत्रशिक्षण राज्यमंत्री . इंद्रनील नाईक, जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक अध्यक्ष . सुधीर तांबे आणि विधानपरिषदेचे सदस्य सत्यजीत तांबे यांचे प्रमुख उपस्थितीत .पार पडला या प्रसंगी

पुरस्कारार्थी बापू निवृत्ती मोरे रा. रसलपूर. यांनी निफाड तालुक्यातील शेतकऱ्यांना एकत्र आणून सी एस सी किसानहेल्प फार्मर प्रोड्यूसर कंपनीची स्थापना केली ऑनलाईन सेवा केंद्राच्या माद्यमातून शेतकरी बांधवाना शेती व शेतीशी निगडीत सर्व सेवा सुविधा पुरविल्या जाणात.बापु मोरे यांचे कार्याची दखल घेऊन त्यांना हा मानाचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले,.. संचालक सौ. रेखा कोटकर, सौ. दिपाली लोंढे, सौ. सविता अष्टेकर, सौ. सविता मेमाणे, सौ. सिंधू मोरे, सौ वर्षा गाजरे, भाऊसाहेब गांगुर्डे, जितेंद्र राजूरकर आदींनी त्यांचे अभिनंदन केले

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पांगळ्या कोंबड्या घेण्यास नकार दिल्याने ५२ वर्षीय व्यक्तीचा खून

## इंदापूर तालुक्यातील गलांडवाडी नं.१ येथील प्रकार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे

इंदापूर तालुक्यामध्ये दिवसेंदिवस गुन्हेगारी च्या प्रमाणात वाढ होत असताना दिसत आहे. त्यातच इंदापुरात पुन्हा एकदा धक्कादायक प्रकार घडला असून पोल्ट्री फार्म मधील लंगड्या कोंबड्या न घेतल्याच्या रागातून पोल्ट्री फार्म वरील कामगारांनी मिळून कोंबड्या नेण्यासाठी आलेल्या गाडी ड्रायव्हरला गंभीर मारहाण करून खून केला आहे.

सदर घटनेत १) निखिल जाधव, २) विकी नलावडे (दोघे रा. गलांडवाडी नं.२, ता.इंदापूर जि. पुणे), ३) लहू शिंदे , ४) विशाल कांबळे (दोघे रा. शिरसोडी, ता. इंदापूर जि. पुणे) यांच्यावर इंदापूर पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

सविस्तर माहिती अशी की, इंदापूर तालुक्यातील गलांडवाडी नं.१ येथील विशाल सूर्यवंशी यांच्या पोल्ट्री फार्म वरती रियाज चुन्नुमीया जहागिरदार (वय ५२ ,रा. सय्यदनगर, लेन नं-२६ एक,नुर मज्जित जवळ हडपसर ता. हवेली, जि. पुणे) हे कोंबड्या गाडीत भरून घेऊन जाण्यासाठी गाडी घेऊन आला होता. त्या ठिकाणी कोंबड्या भरत असताना पोल्ट्री फार्म वरील कामगारांना लंगड्या कोंबड्या गाडीत भरण्यासाठी आणू नका त्या कंपनीमध्ये घेतल्या जात नाहीत असे रियाज चुन्नुमीया जहागिरदार यांनी सांगितले असता लंगड्या कोंबड्या आणू नका म्हनाल्यानंतर विशाल सूर्यवंशी पोल्ट्री फार्मवरील कामगार निखिल जाधव, विकी ननावरे, लहू शिंदे व विशाल कांबळे यांनी रियाज चुन्नुमीया जहागिरदार यांना हाताने तोंडावर व डोक्यामध्ये बेदम मारहाण करून शिवीगाळ केली.

या झालेल्या मारहाणी मध्ये रियाज चुन्नुमीया जहागिरदार यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने ते जागेवरती बेशुद्ध पडले. त्यांना तात्काळ बारामती येथे उपचारासाठी नेले व तेथून ससून हॉस्पिटल पुणे येथे उपचारासाठी नेत असतानाच त्यांचा मृत्यू झाला आहे.




या घटनेतील मारहाण केलेल्या तीन आरोपींना इंदापूर पोलिसांनी अटक केली असून एक हा आरोपी अद्याप फरार आहे. पुढील तपास इंदापूर पोलीस करत आ-हेत.

मात्र एखाद्या लंगड्या कोंबडीसाठी एखाद्या व्यक्तीचा जीव घेणे ही अत्यंत गंभीर व धक्कादायक घटना घडली आहे.

# माजी सैनिक लक्ष्मण निर्मळे यांना अखेरची सैनिक फेडरेशनकडून मानवंदना





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील सुपुत्र लक्ष्मण परशुराम निर्मळे यांचे कमांड हॉस्पिटल येथे उपचारदरम्यान आकस्मित निधन झाले. त्यांची गावामध्ये अंत्ययात्रा काढण्यात आली. भारत माता की जय, लक्ष्मण साहेब अमर रहे, वंदे मातरम घोषणा देण्यात आल्या. लक्ष्मण साहेबांची यशोगाथा मान्यवर माजी सैनिकांनी सांगितले. सण १९८९ मध्ये हे भारतीय सेना मध्ये भरती झाले. संपूर्ण देशभर त्यांनी देशाची सेवा केली. जुलै २००६ मध्ये हे सेवानिवृत्त होऊन समाजकार्याचा वसा घेतला. गावातील वृक्षारोपण मध्ये यांचा मोलाचा वाटा होता.

सैनिक फेडरेशन शिरोळ तालुका उपाध्यक्ष व टाकळीवाडी संघटनेचे खजिनदार व धडाडीचे कार्यकर्ते तसेच शिव सुंदर तरुण मंडळाचे संस्थापक म्हणून त्यांनी कारकीर्द बजावली. टाकळीवाडी येथील स्मशानभूमीत त्यांना अखेरची मानवंदना देण्यात आली. सैनिक फेडरेशन सांगली जिल्हा सातारा जिल्हा कोल्हापूर जिल्ह्यातील आजी माजी सैनिकांच्या उपस्थितीत पार पडला. १८ ऑपरेशन होऊन सुद्धा यांचे कार्य निरंतर होते.

ताईबाई मंदिर बांधकामांमध्ये यांचा मोठा पुढाकार होता. यांच्या पश्चात पत्नी मुलगा ,मुलगी, असा परिवार आहे. यावेळी समस्त समाज, गावा-तील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आषाढी पालखी सोहळ्यातील श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार प्रथम क्रमांक श्री रोहिदास महाराज दिंडी क्रमांक १३ जगद्गुरु संत तुकाराम महाराज दिंडी सोहळा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आषाढी पा-लखी सोहळ्यातील तीन दिंड्यांना श्री श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार व श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने देण्यात आले आहे त्यामध्ये श्री संत रोहिदास महाराज दिंडी क्रमांक १३ संत जगद्गुरु तुकाराम महाराज दिंडी सोहळ्याम ध्ये त्यांना प्रथम क्रमांकाचे बक्षीस सन्म ानचिन्ह व एक लक्ष रुपये असा त्यांना पुरस्कार देण्यात आला आहे. पुरस्कार स्वीकारताना दिंडीचे प्रमुख विश्वस्त ह .भ. प .शंकर महाराज गवळी, सोमनाथ महाराज, श्री शिंदे महाराज विसावा,

वारीची पाई वारी ही महाराष्ट्राची प्राचीन आध्यात्मिक सांस्कृतिक परंपरा आहे व या पाईवारी मुळे ही परंपरा अखंड राहण्यासाठी पाईवरी रक्षण संवर्धन करणे हे आपले सर्व वारकरी वैष्णवांचे सर्वप्रथम कर्तव्य आहे व या पाईवरी सोहळा स्वच्छ निरोगी निरामय राखण्यासाठी सोहळ्यातून समाजाला सामाजिक पर्यावरणवृक्ष संवर्धन ,प्लास्टिक मुक्ती ,व्यसनमुक्ती, स्त्रीभ्रूणहत्या, यासारखी सामाजिक विषयाची प्रबोधनी होणे गरजेचे आहे


आषाढी यात्रेमध्ये सर्व सोहळ्यातील बऱ्याच दिंड्या हे कार्य करत आहेत त्यांच्या कार्याचा उचित असा सन्मान व्हावा त्याचप्रमाणे इतर दिंड्यांनाही त्याचा आदर्श घेऊन या निर्मल वारी हरितवारी या अभियानाम ध्ये सहभाग घ्यावा या उद्देशाने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती मार्फत आषाढी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणी दिंडी पुरस्कार सन २०१८ पासून सुरू करण्यात आला आहे.

आषाढी पालखी सोहळ्यातील पहिल्या तीन क्रमांकाच्या दिंड्यांना आषाढी एकादशी दिवशी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्यांचा येतोच सन्मान करून त्यांना सन्मानचिन्ह व एक लक्ष रुपये चेक देण्यात आला आहे. त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. यासाठी अँड माधवी निगडे, ह भ प प्रकाश जवंजाळ, वृक्षमित्र ह भ प शिवाजीराव मोरे, सदस्यांचा समितीच्या सदस्यांनी श्री रोहिदास महाराज दिंडी क्रमांक १३, श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज सोहळा या दिंडीला प्रथम क्रमांकाचे बक्षीस देण्यात आले आहे.

# आषाढी यात्रेमध्ये उत्कृष्ट काम केल्याबद्दल अधिवेशनात अभिनंदनचा ठराव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आषाढी यात्रा मध्ये उत्कृष्ट काम केल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार साहेब, ऊस सोलापूर जिल्ह्याचे कार्यकर्तबगार पालकमंत्री जयकुमार गोरे साहेब, सोल-ापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद साहेब, सोलापूर जिल्ह्या-चे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी साहेब, तसेच यांच्यासह जिल्हा परिषद मुख्याधिकारी कुलदीप जंगम साहेब पंढरपूर नगरपालिका मुख्य अधिकारी महेश रोकडे, पंढरपूर विभाग उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अर्जुन भोसले साहेब शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, पंढरपूर तालुका ग्रामीण वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर, तालुका ग्राम ीण वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुंबई साहेब, तसेच पंढरपूर उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे, पंढरपूर तालुका तहसीलदार




सचिन इथापे, पंढरपूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी संजय संसारे, तसेच सांगोला ,मंगळवेढा ,करमाळा येथील तालुक्यातील वेगवेगळ्या विभागातील अधिकारी कर्मचारी या सर्वांनी आषाढी यात्रेमध्ये अतिशय मोलाची व उत्कृष्ट काम केल्याबद्दल आज अधिवेशनामध्ये, या सर्व अधिकाऱ्यांचा अभिनंदन ठराव करून धन्यवाद देण्यात आले.

# शिवसेना विभागप्रमुख दिलीप मामा लांडे यांच्या हस्ते आषाढी एकादशी निमित्त फराळ वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : दरवर्षी प्रमाणे यंदाही देवशयनी आषाढी एकादशी निमित्त कार्यसम्राट आमदार व शिवसेना विभागप्रमुख दिलीप मामा लांडे यांच्या हस्ते घाटकोपर पश्चिम येथील सर्वोदय विठ्ठल रुक्मिणी मंदिरात भाविकांसाठी खिचडी,फळ व प्रसाद वाटप करण्यात आले.

तसेच यानिमित्त कीर्तन सोहळ्याचे देखील आयोजन करण्यात आले





होते.या कार्यक्रमाला उपविभागप्रमुख हरेश अण्णा धांद्रूत,महिला विधानसभा प्रमुख संगीताताई हुले,शाखाप्रमुख नंदू मोरे,विजय कोईलकर,मंगेश भोर,मनीष कळंबे तसेच घाटकोपर शिवसेनेचे सर्व महिला व पुरुष पदाधिकारी,कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे नियोजन हरेश अण्णा धांद्रूत व नंदू मोरे यांच्याकडून करण्यात आले होते.

# झी सारेगमप गायक रेवणसिद्ध फुलारी यांना राज्यस्तरीय स्वरसाधक पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : जर तुम च्या मनात काहीतरी साध्य करण्याची इच्छा असेल तर तुम्ही ते साध्य करू शकता आणि रेवणसिद्ध फुलारी हे आपल्या सर्वांसाठी प्रेरणास्थान आ-हेत, असे प्रतिपादन बेंगळुरू येथील कलाभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष, अभिनेता, निर्माता आणि दिग्दर्शक ऑस्कर कृष्णा यांनी केले.

कलाभूमी प्रतिष्ठानच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त बेंगळुरू येथील पद्मरागा सभागृहात रविवारी आयोजित स्वरसंभ्रम राष्ट्रीय स्तरा-वरील गायन कार्यक्रमात, महाराष्ट्र - कर्नाटक राज्याचे सीमावर्ती भागा-तील अक्कलकोट तालुका तोळनूर गावचे विशेष प्रतिभा असलेल्या झी कन्नड सारेगमप गायक रेवणसिद्ध फ ुलारी यांना प्रतिष्ठेच्या स्वरसाधक पुरस्कार प्रदान करून बोलत होते.

व्यासपीठावर प्रसिद्ध चित्रपट अभिनेत्री संजना नायडू, आर्यन, निर्माती शांती डी. अवरादि, रूपश्री,पूजा आणि इतर मान्यवर उप-स्थित होते.

अभिनेता-दिग्दर्शक ऑस्कर कृष्णा पुढे म्हणाले की, आयुष्यात कोणत्याही गोष्टीची भीती बाळगू नये. कोणत्याही क्षेत्रात यश मिळवण्यासाठी प्रामाणिक काम, प्रयत्न आणि दृढनिश्चय खूप महत्त्वाचा आहे. संगीताची पार्श्वभूमी नसतानाही जग न पाहिलेल्या रेवणसिद्धने आता जगाला आपल्याकडे पाहण्यास भाग पाडले आहे. त्यांना त्यांच्या पुढील उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.



सुरुवातीला मान्यवरांनी दीपप्रज्वलन केले आणि श्रुती भट्ट यांच्या प्रार्थनागीताने कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. सकाळी ९.०० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत राष्ट्रीय स्तरावरील गायन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. देशभरातील गायकांनी या कार्यक्रमात येऊन कार्यक्रमाचा उत्साह वाढवला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेच्या पदाधिकारी अरुण अग्निहोत्री, लोकेश, निंगराजु, मधुसूदन, प्रशांत, रूपश्री, पल्लवी अग्निहोत्री, रश्मी यांनी परिश्रम घेतले.

पूजा हिने सूत्रसंचलन केले तर ऑस्कर कृष्णा यांनी आभार मानले.

फोटो ओळ - कलाभूमी प्रतिष्ठानच्या तिसऱ्या वर्धापनदिनानिमित्त अक्कलकोट तालुका तोळनूरचे सुपुत्र झी कन्नड सारेगमपचे गायक रेवणसिद्ध फुलारी यांना स्वरसंभ्रम राष्ट्रीय स्तरावरील गायन कार्यक्रमात स्वरसाधक राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ऑस्कर कृष्णा, चित्रपट अभिनेत्री संजना नायडू, आर्यन, निर्माती शांती डी. अवरादी, बाबू, अरुण अग्निहोत्री, रूपश्री, पूजा,पल्लवी अग्निहोत्री आदी उपस्थित होते.

**सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर नगरीत विविध उपक्रम**

**भारतीय संविधानाचा जागर...**

# बार्टी संस्थेच्या वतीने आषाढी वारीत संविधान दिंडी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनीधी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), ही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था, यांच्या वतीने संविधान दिंडी या आगळ्या-वेगळ्या उपक्रमाची आज आळंदी येथे उद्घाटन करण्यात आली.

संविधानाचा अमृत महोत्सव याचे औचित्य साधून आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आळंदी ते पंढरपूर या १९ दिवसांच्या प्रवासादरम्यान, संविधानाचे मूल्य, अधिकार आणि प्रस्ताविकेचे महत्त्व वारकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचा उद्देश या उपक्रमामागे आहे.

संविधान दिंडीमध्ये सहभागी समतादूतांच्या माध्यम ातून पथनाट्य, प्रश्नमंजुषा, प्रस्ताविकेचे वाटप आणि संविधान जागृतीचे विविध कार्यक्रम राबवले जात आ-हेत. या उपक्रमाचे मार्गदर्शन सामाजिक न्याय विभागाचे मंत्री श्री. संजय शिरसाठ, प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे तसेच बार्टीचे महासंचालक श्री सुनील वारे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात येत आहे.

ही संविधान दिंडी पुणे, सातारा व सोलापूर ह्या जिल्ह्यातून जात असून प्रचंड मोठ्या प्रमाणात सहभागी होणारे विठ्ठल भक्त यांना आज संविधानाचे महत्त्व विशद करण्यासाठी संविधान दिंडीचे वेळापूर येथे येत असून आज संविधान पर विविध गीता गीते माध्यमातून भक्तगणांपर्यंत संविधानाचे महत्त्व पोचवण्याची कामकाज सुरू आहे

बार्टी संस्थेचे निबंधक, श्रीमती इंदिरा आस्वार , श्रीमती नसरीन तांबोळी, प्रकल्प व्यवस्थापक, प्रकल्प अधिकारी प्रणिता कांबळे, व माळशिरस समतादूत किरण वाघमारे, नालंदा शिंदे, अश्विनी सुपाते, ज्योती ओहळ, मुकुंद लोंढे, कृष्णा आळंदकर, अतिश बेंद्रे या सर्वांच्या माध्यमातून हे उपक्रम यशस्वीपणे सुरू आहे.

तसेच पंढरपूरपूर ना-गरी मध्ये भव्य समारोप कार्यक्रम करण्यात आला. बार्टी संस्थेच्या वतीने प्रकल्प व्यवस्थापक नसरीन तांबोळी , इतर पदाधिकारी रिपाई तालुका अध्यक्ष संतोष पवार, शाहीर कुणाल वराळे, शाहीर राजेंद्र कांबळे,रवींद्र शेवडे सर,समता सैनिक दल पंढरपूर, भारतीय बौध्द सभा, येथे सर्व भक्तगण सोबत संविधान उद्देशिकेचे वाचन करून सर्वांना मोफत उद्देशिकेचे वाटप करण्यात येते.

तसेच शाहीर कुणाल वराळे यांना आपल्या शाहिरी च्या माध्यमातून संतांची स्वतंत्र, समता, बंधूता प्रबोधन कारण्यात आले.तसेच शाहीर राजेंद्र कांबळे यांनी ही आपली कला सादर केली

संविधानाच्या शिक्षणाची गंगा क्तिरसामध्ये मिसळून लोकांपर्यंत पोहोचावी, यासाठीचा हा उपक्रम नक्कीच समाजजागृतीस चालना देण-ारा असा हा उपक्रम आहे या उपक्रमासोबत बार्टी संस्थेच्या विविध योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्याचे कामकाज देखील समता सम तादूत यांच्या मार्फत करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समता किरण वाघमारे यांना केले.



# ज्ञानोबा-तुकोबांचे अद्वैतच भारताला विश्वगुरु बनवेल

## विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा.कराड यांचे विचार; हभप बापूसाहेब मोरे, बाळासाहेब बडवे, हभप हिरामण मोरे, गोदावरीताई मुंडे व शशीकलाताई केंद्रे यांचा जीवन गौरव पुरस्काने सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**तत्त्वज्ञ संत श्री ज्ञानेश्वर माऊली जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराज समर्पित जीवन गौरव पुरस्कार' आणि 'तत्वज्ञ संतश्रेष्ठ श्री जनाबाई समर्पित जीवन गौरव**

पंढरपूर/प्रतिनिधी : :तत्त्वज्ञ संतश्री ज्ञानेश्वर माऊली ते सहस्त्रकातील श्रेष्ठ शास्त्रज्ञ अल्बर्ट आईनस्टाईन यांच्या ज्ञान-विज्ञान संगमातील तत्त्वज्ञानाचा पाया हा भारतीय मूळ विचारधारा असणार्या अद्वैताचा आहे. ॐ = ई = एमसीस्वेअर या सिद्धांताचा प्रवासच विश्वाच्या कल्याणाचे सूत्र आहे. हेच सूत्र संपूर्ण विश्वाला भारतमातेच्या रुपात विश्वगुरु बनून शांती व समृध्दीचा मार्ग दाखवेल. असे विचार श्री क्षेत्र आळंदी देहू पंढरपूर परिसर विकास समितीचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी मांडले.

विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, श्री क्षेत्र आळंदी देहू पंढरपूर परिसर विकास समितीच्या संयुक्त विद्यमाने वाखरी येथील पालखी तळा शेजारी विश्वशांती गुरुकुल परिसरात आयोजित करण्यात आलेल्या 'तत्त्वज्ञ संत श्री ज्ञानेश्वर माऊली जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराज समर्पित जीवन गौरव पुरस्कार' आणि 'तत्वज्ञ संतश्रेष्ठ श्री जनाबाई समर्पित जीवन गौरव पुरस्कार' प्रदान कार्यक्रमात ते बोलत होते.

या प्रसंगी जगद्गुरु तुकोबांचे १४ वे वंशज हभप बापूसाहेब मोरे, देशभक्त व पत्रकार हभप बाळासाहेब बडवे आणि भारुडाद्वारे समाजप्रबोधन करणारे हभप हिरामण मोरे यांना 'तत्त्वज्ञ संत श्री ज्ञानेश्वर माऊली जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराज समर्पित जीवन गौरव पुरस्कार ' आणि प्रसिदध किर्तनकार गोदावरीताई मुंडे आणि शशीकलाताई केंद्रे यांना 'तत्वज्ञ संतश्रेष्ठ श्री जनाबाई समर्पित जीवन गौरव पुरस्कार' ने गौरविण्यात आले. पुरस्काराच्या स्वरूपात ५१ हजार रुपये, शाल, ज्ञानेश्वर माऊलीची प्रतिमा व मानचिन्ह प्रदान करण्यात आले.

यावेळी वारकरी महामंडळाचे अध्यक्ष हभप प्रकाश महाराज जवंजाळ, मुंबई येथील वारकरी प्रबोधन महासमितीचे संस्थापक अध्यक्ष हभप रामेश्वर शास्त्री महाराज हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते.



अध्यक्षस्थानी श्री क्षेत्र आळंदी देहू पंढरपूर परिसर विकास समितीचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे होते. तसेच हभप तुळशीराम दा. कराड, सौ. उषा विश्वनाथ कराड उपस्थित होते.

डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, स्वामी विवेकानंद यांनी भारतमातेच्या विश्वात्मक स्वरुपाची जी कल्पना केली ती विवेकानंदांचे पाईक होऊन प्रत्यक्ष अवतारीत करण्याची सुसंधी लाभली ही माऊलींची योजनाच समजतो. गेल्या ७ वर्षापासून मला सकाळी सकाळी सूचना येतात की हे कर आणि हे करू नको. त्या संकेतावर विचार चक्र सुरू होते. नंतर भारतीय संस्कृती व तत्वज्ञानाचे खरे स्वरूप मांडण्यासाठी कर्म करतो. ज्यावेळेस समाजात माऊलीचे पसायदान आणि भगवान गौतम बुद्धांच्या पंचशीलाचे मिलाप होईल त्यातूनच विश्वशांतीची दिशा दिसेल. संगीताच्या साधनेतूनच ईश्वर दर्शन व शांत रसाचा अनुभव येईल.

हभप प्रकाश जवंजाळ महाराज म्हणाले, समाज कल्याणासाठी जीवन समर्पित करणारे डॉ. कराड यांच्या मागे प्रयागअक्का यांची पुण्याई आहे. त्यांचा त्याग, तपश्चर्या याचेच हे बळ आहे. त्यांनी जीवनात कधिही सेवा करण्याची संधी सोडलेली नाही. कर्तृत्वाच्या बळावर देशाच्या शिखरावर पोहले पण अंगी अहंकाराचा जराही वारा नाही. शांतीचा संदेश देण्यासाठी ते सतत प्रयत्नशील आहेत. त्यातूनच त्यांनी वारकरी सांप्रदायाला जगासमोर मांडले.

हभप रामेश्वर शास्त्री महाराज म्हणाले, सत्य संकल्पाचा दाता या नुसार डॉ. कराड यांना सकाळी सकाळी मिळणार्या संकेतांना साकार करण्यासाठी परिपूर्ण प्रयत्न करतात. ते भक्ती, ज्ञान आणि वैराग्याचे त्रिवेणी संगम आहेत. वैभव संपन्नता असून ही वारकरी संप्रदायाची साथ सोडली नाही. त्यांनी भारतीय तत्वज्ञानाचे ज्ञान संपूर्ण जगात पोहचविले. शिकलेल्या माणसाने इंद्रायणी घाटावर यावे यासाठी घाटांची निर्मिती केली. ज्ञानोबा तुकोबाचा संदेश संपूर्ण जगात पोहचविण्यासाठी ते अहोरात्र झटत आहेत.

सत्काराल उत्तर देतांना हभप बापूसाहेब मोरे म्हणाले, डॉ. कराड यांनी धर्माचे उत्तम कार्य करीत लाखों लोकांचे कल्याण केले आहे. ते ८५ वर्षाचे तरूण आहेत त्यांच्यातील ऊर्जा, उत्साह हा सदैव सत्कर्म करण्यासाठी प्रेरित करीत असतो. ते शिखरावर पोहचले असले तरी त्यांचा मुळ पिंड संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराजांचा आहे. त्यांनी लावलेले बीज आज वटवृक्षामध्ये परिवर्तन झाले आहे.

बाळासाहेब बडवे म्हणाले,डॉ. विश्वनाथ कराड यांच्या जीवनशैलीकडे पाहिले तर ते वारकरी संप्रदायाचे अधिष्ठीत व्यक्तीमत्वाचे आहे. त्यांनी संपूर्ण कुटुंब घडविले आणि तो एक वेगळा संदेश संपूर्ण जगाला दिला आहे. पांडुरंगाच्या छत्र छायेत ते वारकरी संप्रदायाबरोबरच संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी कार्य करीत आहेत.

त्यानंतर गोदावरीताई मुंडे, शशीकलाताई केंद्रे आणि हिरामय मोरे महाराज यांनी आपल्या भावना व्यक्त करतांना सांगितले की, उर्जा देणारे हे महात्मा आहेत. तसेच संगीत साधनेतूनच ईश्वर दर्शन घडते. याची प्रचिती आज येथे दिसत आहे. डॉ. कराड यांच्यात माऊलीचे रूप पाहतो. त्यांच्या हस्ते हा सन्मान होणे हे आमचे भाग्य आहे.

माईर्स एमआयटीचे कुलसचिव डॉ. रत्नदीप जोशी यांनी सूत्रसंचालन केले.

# रायते वस्ती शाळेत बालगोपालांचा रंगला दिंडी सोहळा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी:- आषाढी एकादशी निमित्त जि. प. शाळा रायते वस्ती(खडक माळेगाव) ता. निफाड शाळेतील विद्यार्थ्यांनी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. 'ज्ञानबा-तुकाराम', 'माऊली-माऊली' नामाचा गजर करत भक्तिमय वातावरण निर्माण केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका संगिता कापसे, माधव रायते, बाबाजी रायते, विष्णू रायते, रमेश रायते, कांताबाई रायते, मंदा रायते,उषा रायते आदि मान्यवरांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी गळ्यात तुळशीमाळा, कपाळी गंध, हाती टाळ व भगव्या पताका अशी वेशभूषा करित विविध संतांच्या भुमिका साकारल्या. मुलींनी डोक्यावर कलश, तुळशी वृंदावन घेऊन दिंडीत सहभाग घेतला.

दिंडी चे रिंगण करून विठ्ठल विठ्ठल विठ्ठला जय हरी विठ्ठला , धरिला पंढरीचा चोर अशा विविध गीतांवर विद्यार्थ्यांनी ठेका धरला. मुलींसह माता पालकांनी फुगड्यांचा मनसोक्त आनंद लुटला. चिमुकल्या वारकऱ्यांनी 'ज्ञानबा-तुकारामचा' गजर करीत परिसर दणाणून टाकला. विलास राजोळे, साहेबराव रायते यांच्या हस्ते सर्व चिमुकल्या वारकऱ्यांना फराळ वाटप करण्यात आले.

संतांची थोर परंपरा, दया, क्षमा, शांती, परोपकार , भक्तीभाव अशा विविध सद्गुणांची दिंडी सोहळ्यातून प्रत्यक्ष अनुभुती देणाऱ्या या उपक्रमाचे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर रायते, उपाध्यक्ष रविद्र रायते व पालकांनी कौतुक केले. दिंडी सोहळ्यासाठी संगीता कापसे, शशिकांत पाटील, गायत्री रायते, अश्विनी रायते यांनी परिश्रम घेतले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय महाड येथे तिमिरातून तेजाकडे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




बोरघर / माणगांव ( प्रतिनिधी ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागा द्वारे श्री. सत्यवान रेडकर, कनिष्ठ अनुवाद अधिकारी, सीमाशुल्क विभाग, भारत सरकार, मुंबई यांच्या प्रमुख मार्गदर्शनाचा लाभ महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना मिळाले. मार्गदर्शनातून श्री. रेडकर यांनी सरकारी सेवा कोणकोणत्या आहेत, त्या मध्ये कोणकोणती पदे असतात, मिळविण्यासाठी कोणत्या स्पर्धा परीक्षा असतात, त्यांचे आयोजन कोण करते, भारत सरकार आणि राज्य सरकार यांच्या कोणत्या परीक्षा असतात, त्यासाठी काय पात्रता हवी असते, कश्या पद्धतीने अभ्यास करायचा असतो, क्लास लावायची गरज कशी नसते, अभ्यास कसा करावा याचे समग्र स्वरूपाचे उदाहरणासह स्पष्टीकरण दिले.,चर्चा केली ज्यामुळे विद्यार्थ्यांना सरकारी नोकरी मिळविण्यासाठी प्रेरणा निर्माण झाली.

अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ योगेश प्रमिला प्रभाकर बोराळे यांनी आपले भविष्य घडविण्यासाठी स्पर्धा परीक्षा ही अत्यावश्यक आहे तशी पदवी देखील महत्वाची आहे, मग ती कोणतीही असो, गुण जास्तच हवे असे नाही, कला, वाणिज्य व विज्ञान, अभियांत्रिकी, कृषी, वैद्यकीय स्तरावरील कोणतीही पदवी स्पर्धा परीक्षेसाठी महत्वाची असते आणि एकदा अपयश आले कि संपले सर्व असा अर्थ होत नाही. अपयशाकडे सकारात्मक आणि गांभीर्याने पाहिल्यास आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कारणीभुत ठरते. कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ राकेश सोनार, एन् एस् एस् कार्यक्रम अधिकारी प्रा गणेश वतारी, प्रा. बटावले, प्रा. विकास जाधव, प्रा. ईशरत मॅडम, प्रा. नेहा पवार मॅडम, प्रा. पूर्वा चक्रदेव मॅडम, प्रा. सुदर्शन कुलाबकर आणि कला, वाणिज्य विभागातील २०० विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पूर्वा चक्रदेव मॅडम यांनी केले आणि प्रा. गणेश वतारी सरांनी आभार प्रदर्शन केले आणि कार्यक्रमाची सांगता केली.

# माजी विद्यार्थ्यांकडून शाळेस एलसीडी टीव्ही भेट




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शहापूर प्रतिनिधी/दिनेश घनघाव : रविवारी दिनांक ६ जुलै २०२५ रोजी सज्जन व्यक्तींची संपत्ती ही परोपकारासाठीच असते, शिवाय ज्ञानाचं शिक्षण केवळ पुस्तकापुरतं मर्यादित न राहावं, तर ते दृश्य, श्राव्य आणि अनुभवातून घडावं.

यासाठी आजच्या काळात LCD TV ही एक अत्यावश्यक शैक्षणिक साधनं बनलं आहे.याच गरजेची जाणीव ठेवून, सन १९९८ - ९९ च्या इ .७ वीच्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी जि.प शाळा अस्नोली शाळेस LCD TV भेट दिला. अस्नोली विकास प्रतिष्ठानकडून आयोजित करण्यात आलेल्या गुणगौरव समारंभात ही भेट शाळेच्या मुखाध्यापक व शिक्षकवृंदांना सोपवण्यात आली. यावेळी भगवान दिनकर, विश्वास सातपुते, दीपक दिनकर, अरुण देसले दर्शना कोंगेरे, अरुणा दिनकर हे माजी विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

या आधीही ह्याच माजी विद्यार्थ्यांनी शाळेला LCD TV भेट दिला होती.

या साधनामुळे चित्रफिती, विज्ञान प्रयोगांचे व्हिडीओ, ई-शिक्षण, शैक्षणिक मल्टिमिडिया या सर्व गोष्टी LCD TV च्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवता येण्यास मदत होईल .

शाळेला मिळालेली ही भेट म्हणजे नव्या पिढीच्या उज्वल भविष्याची रोशनी ठरेल.

शाळेला वस्तुरुपी दान देणाऱ्या सर्व माजी विदयार्थ्यांचे मनपूर्वक कौतुक व आभार शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व गावचे सरपंच विष्णू देसले, उपस्थित गावकरी जयवंत दिनकर, दामोदर दिनकर, शिवाजी दिनकर (अध्यक्ष विकास प्रतिष्ठान), कैलास दिनकर(उपाध्यक्ष विकास प्रतिष्ठान) व इतर गावकरी यांनी व्यक्त केले.

**वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा कार्यक्रम**

**राजाभाऊ सरवदे यांचे प्रतिपादन**

# अविनाश मडिखांबे सारख्या कार्यकर्त्यांचे वाढदिवस साजरा करायला अभिमान वाटतो

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/तालुका प्रतिनिधी : रिपाइं(आठवले गट)चे अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे सारख्या कर्तबगार स्वाभिमानी कार्यकर्त्यांच्या वाढदिवसाच्या अभिष्टचिंतन सोहळा साजरा करायला मला अभिमान वाटतो असे प्रतिपादन रिपाइंचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा.राजाभाऊ सरवदे यांनी व्यक्त केली आहे.

अक्कलकोट भिमनगर येथील महात्मा बसवेश्वर मंदीर पटांगणात आयोजित वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा कार्यक्रम आयोजित केला होता.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेनेचे तालुका अध्यक्ष संजय देशमुख हे होते अक्कलकोट तालुक्यात अनेक निवडणुकीमध्ये महायुतीच्या उमेदवारांना निवडून आणण्यात सिंहाचा वाटा आहे तो एक प्रामाणिक कार्यकर्ता आहे असे प्रतिपादन देशमुख यांनी केले तर काम करणाऱ्या नेत्याच्या पाठीशी यावेळी जनतेने खंबीर उभे राहून आशीर्वाद द्यावा अविनाशचे कार्यक्षेत्र आता तालुक्यापुरते मर्यादित राहिले नसून सर्व जाती धर्माला घेऊन चालणाऱ्या या कार्यकर्त्याला लवकरच अकरा तालुक्याची जबाबदारी देण्याचा पक्षाचा मानस आहे जनतेने मागे राहावे असे आवाहन रीपाई प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांनी जनतेला केले कार्यक्रमाचे प्रस्तावना व सूत्रसंचालक प्रा.राहुल रुही यांनी केले तर सत्काराला कार्यकर्त्यांचे आभार मानताना अविनाश मडीखांबे म्हणाले की आजवर हजारो लोकांची




कामे केली आहेत पुढे ही करू माझा कुणी शत्रू नाही ना विरोधक, मी सगळ्यांची कामे करतो जनतेने येणाऱ्या निवडणुकीत आशीर्वाद द्यावा

या प्रसंगी मनोज कल्याणशेट्टी, शिवसेना तालुका अध्यक्ष संजय देशमुख,माळी महासंघाचे तालुका अध्यक्ष अप्पू पराणे,मुस्लिम समाज अध्यक्ष एजाज मुत्तवली, नगरसेवक नागराज कुंभार, बंटी राठोड, सुनील खवळे, प्रहार संघटनेचे शहर अमर शिरसाठ, शिवसेना शहर प्रमुख योगेश पवार, रासप अक्कलकोट तालुकाध्यक्ष दत्ता महाडकर, मैंदर्गीचे माजी नगराध्यक्ष किरण केसूर, विजय हर्डीकर, महेश शावरी, बसवराज सोनकांबळे, सुग्रीव जेठिथोर, सुनील सिद्धे, मुन्ना राठौर, अमोल बिराजदार, निळकंठ हिंडोळे, शाम धुरी, बाळासाहेब मोरे, विकी बाबा चौधरी, नन्नू भाई कोरबू, संदीप मडिखांबे, शिलमनी बनसोडे,

रिपाइं सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, युवक तालुका अध्यक्ष अप्पा भालेराव, शहर अध्यक्ष अजय मुकणार, तालुका सरचिटणीस राजु भगळे, विजयकुमार बाळशंकर, बंडू काका मडिखांबे, कल्याणी घाटगे, श्रीकृष्ण सुतार, भारत सोनकांबळे, दत्ता मडिखांबे, अर्जुन साळे, चनवीर मडिखांबे, अंबादास बनसोडे, स्वामी गायकवाड, बाळासाहेब मडिखांबे, शिवशरण शिंदे, शिवानंद मडिखांबे, सुरेश सोनकांबळे, पंकज मडिखांबे, अप्पू गायकवाड, सूरज सोनके शिरवळ शाखा अध्यक्ष उत्तम गायकवाड, विलास गायकवाड, गौतम गायकवाड, सिध्दार्थ गायकवाड, उमेश शिवशरण, राजशेखर गायकवाड, विजय मानकर, सिध्दु कांबळे, दिलिप माळी, विजय पोतेनवरु, तम्मा दसाडे, अमोल पुटगे, शुभम मडिखांबे, सुरेश गायकवाड, अंबादास शिंगे, गोरखनाथ धोडमनी, राजु कांबळे, यमनप्पा शिंदे, बाबु निरगुडे, दत्ता कांबळे, संतोष जन्ना, सतिश लोड्डे, रितेश बळूंडगी, विश्वमगी, गुरु धोडमनी, संतोष बिराजदार, रमेश धोडमनी, शिवानंद धोडमनी, कृष्णा धोडमनी सचिन बनसोडे, प्रणेश बनसोडे, प्रशिक बनसोडे, ज्ञानेश्वर दसाडे, पुटराज मडिखांबे, प्रशांत मडिखांबे, शीवा मडिखांबे, दिनेश रुही, अजय मडिखांबे, विजय मडिखांबे, नितेश मडिखांबे ,बंटी मडिखांबे, सचिन कुमार बनसोडे, दिपक मालक मडिखांबे, प्रदिप सर्जन, दशरथ मडिखांबे, नागेश मडिखांबे, आकण्णा मडिखांबे, भीम मडिखांबे, रोमीत मडिखांबे, प्रेणेश बनसोडे, प्रशिक बनसोडे, चंद्रकांत गायकवाड,यांच्या सह वेगवेगळ्या गावाहून आलेले कार्यकर्ते, नागरीकासह,महिला समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.